**वाचले :- 1.** प्रादेशिक हवामान केंद्र, भारतीय हवामान खाते, नागपूर यांचा दि.18/07/2023 चा हवामान ईशारा.
2.आपत्ती व्यवस्थापन अधिनियम,2005

---

**क्र/कावि/मह.सहा/नै.आ/ 199 /2023**
**जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालय**
**दि. 18/07/2023**

**आदेश : -**

**ज्याअर्थी** चंद्रपूर जिल्ह्यात आज दिनांक 18/07/2023 रोजी झालेल्या अतिवष्टीमुळे तसेच भारतीय हवामान खात्याच्या वर्तवलेल्या अंदाजानुसार दिनांक 18/07/2023 व 19/07/2023 रोजी चंद्रपूर जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**आणि ज्याअर्थी** चंद्रपूर जिल्हयात कोणत्याही प्रकारची अनुसुचित घटना घडू नये तसेच अतिवष्टीमुळे आपतकालीन परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा परिणाम शालेय विद्यार्थ्यावर होऊनये या करिता चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व शाळा(अंगणवाडी, पुर्व प्राथमिक व प्राथमिक) विद्यालये व महाविद्यालये यांना दिनांक 19/07/2023 रोजी सुट्टी असणे आवश्यक आहे अशी माझी खात्री झाली आहे.

**त्याअर्थी,** मी विनय गौडा जी सी, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर, मला आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 मधील कलम 30 (2)(5) व (18) नुसार प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, चंद्रपूर **जिल्ह्यातील सर्व शाळा, विद्यालय व महाविद्यालयांना दिनांक 19/07/2023 रोजी सुट्टी जाहिर करीत आहे.**

तरी नागरीकांनी भारतीय हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार सतर्क राहून आवश्यक खबरदारी घ्यावी व आपतकालिन परिस्थितीत खालील दिलेल्या ठिकाणी संपर्क साधावा.

1.जिल्हा आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर
संपर्क क्र.07172 251597 07172 272480

**(विनय गौडा जी सी)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**चंद्रपूर**

प्रतिलिपी : 1. मा. विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर
2. मा.संचालक, आपत्ती व्यवस्थापन केंद्र मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव.
3. पोलिस अधिक्षक, चंद्रपूर
4. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात यावे.

5. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद चंद्रपूर यांना माहिती व उचित कार्यवाही करीता.
6. शिक्षणाधिकारी, प्राथमिक/माध्यमिक जिल्हा परिषद चंद्रपूर यांना सुचित करण्यात येते की आपल्या अधिनस्त सर्व शाळांना सुचना दण्यात यावी.
7. शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, चंद्रपूर यांना सुचित करण्यात येते की आपल्या अधिनस्त सर्व शाळांना सुचना दण्यात यावी.
8. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी जि.प.चंद्रपूर
9. संचालक आकाशवाणी केंद्र चंद्रपूर यांनी आपल्या स्तरावरून प्रसिध्दी द्यावी.
10. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर यांना उचित कार्यवाही कररता अग्रेषित.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**चंद्रपूर**